॥ ॐ श्रीगुरुशरणम् ॥

आळंदीनिवासी श्रीमत् सत्यदेवानन्द सरस्वती यति विरचित

श्रीमत् प. प. श्रीधरस्वामी महाराज

॥ स्तवन पंचक ॥

श्रीमन्मंगलमूर्ति भव्य नमितो वाग्देवता शारदा
सीताराम समर्थ-पद स्मरतां स्वानंद वाढे सदा
सेवा उत्कट साधुनी सकळिकां जे सेव्य झाले जनीं
श्रीमत् श्रीधरस्वामिराज यति ते सप्रेम ध्यातो मनीं ॥ १ ॥

' पोतेऱ्यापरि मानुनी निजतनु, प्राणें मनें चिंतनें
सेवावा गुरु ' सांगती, परि तिही केलें तसें बोलणें
स्वांगें तोषवुनी गुरूस, मिरवे हा ' दास ' भक्ताग्रणी
श्रीमत् श्रीधरस्वामिराज यति ते सप्रेम ध्यातो मनी ॥ २ ॥

बांधा सुदृढ, सावळी तनु दिसे नेत्रांत चंद्रप्रभा
कषायांबर शोभते, स्मितमुखी वैराग्यगाभा उभा !
' माताऽहं जगतो' दयार्द्र वसतो हा भाव ज्या लोचनी
श्रीमत् श्रीधरस्वामिराज यति ते सप्रेम ध्यातो मनीं ॥ ३ ॥

नादब्रह्म मुसावलेंचि अथवा वार्धक्य आले सतीं
तैसे साच मवाळ आणि मितले स्वामी पहा बोलती
स्वामींच्या वदनीं सदा स्रवतसे सद्बोध ही स्वर्धुनी
श्रीमत् श्रीधरस्वामिराज यति ते सप्रेम ध्यातो मनीं ॥ ४ ॥

ऐसा श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ असुनी आचारसंपन्नही
स्वामी दीनदयाळ वत्सल बहू कोठे न लाभे मही
आनंदें यति सत्यदेव रमतो तन्नामसंकीर्तनीं
श्रीमत् श्रीधरस्वामिराज यति ते सप्रेम ध्यातो मनीं ॥ ५ ॥

॥ ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु ॥

मिती आषाढ कृ॥ ५।१८८७ दिनांक १९ जुलै १९६५ आळंदी

श्रीस्वामी समर्थ महाराज, शक्तिपीठ, कोल्हापूर.

श्री

सद्गुरु

प. प. भगवान श्री श्रीधरस्वामी महाराज

यांचे

बावन्न श्लोकी चरित्र

सौ. शैलजा वि. साठे.
बेळगांव

श्री

१

साक्षात् दत्तप्रभु जगी अवतरे, सद्धर्म रक्षावया
अज्ञानांध जनासी मार्ग क्रमण्या, आधार तो द्यावया
उजळे ज्ञानदिवा सुभक्त हृदयी, हृद् तैं प्रकाशितसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

२

चिंचोळीभूमी भाग्यवान् ठरली, अवतार तो जाहला
नाहीं सान आतां महान वनली, की प्रभु जन्मला
जन्मस्थान विशेष भाग्य पद ते, मौसीगृहा देतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

३

संवत्सर पूर्ण एक तप ते मातापित्याचे असे
लाभे पूर्ण कृपा श्रीप्रभुची, फळ ओटीमध्ये येतसे
श्री नारायण त्यापरीच कमला सफला तदा होतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

४

पूर्वीचीच असे सुमंगल तिथी वेळा ही तैशीच ती
पूर्णत्वे परिपूर्ण ते असुनिया, प्रकृतीस स्विकारिती
आनंदाची पूर्ण विश्व विलसे, पतकी कुलाची असे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

५

लीला त्या अति गोड फार प्रभुच्या सर्वांसी दे तुष्टता
नमः श्रीधर वदता, राग मग तो कशास हो करता
पुसुनि स्वरूप अपुले जणूं काकास सुचवितसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

६

आत्मारामची राम नाम ठसले, वैखरीत की तेधवा
मातेने कथिले सुतास अपुल्या की संकटी जेधवा
तेची वाळकडू स्वतः पचविले, अन्यास रुजवितसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

७

विश्वाचा जरी नाथ तरी तो, झाला अनाथ लोकी ही
येवोनि पुण्यपत्तनी विचरतो, राहे अनाथ गृही
येथेची पद लाधले स्वामी हे, सकलेच्छा पुरवितसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

८

आतां कार्य विशेष कांहीं अपुले जन्मास येवोनिया
साधु होईन ध्येय हेच पुढती, नच गम्य लोकात या
ऐसे मंथन चालले निशीदिनी, स्वमनी विचारितसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

९

होता सज्जन एक कुणी, समीप तो पाहे सदा श्रीधरा
योगायोग असा कीं जुळला तैं, तो घेवोनी जाये घरा
दोघांची जुळली मने मग तया श्रीधर विचारीतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

१०

वाटे फार मनात मजसी कीं सुबहु करावे तप
योग स्थान असे विशेष रूपसे सुफलित होण्या जप
सांगे तो बहुपरी, तरी गिरी, सज्जन विशेष रूपसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

११

दशमी ती विजया मुहूर्त शुभ तो, जाण्या तपासी तया
निश्चय तो करुनी मनी मग निघे, मोहास त्यागोनिया
भेटाया मन ते अधीर गुरुसी, मार्गी कसे होतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

१२

झाले क्लेश अनंत मार्गी तरीही, आहे धीरोदात्त हा
विघ्ने भय दाविती निशीदिनी, तरी चाले कसा हा पहा
इच्छित स्थळी ठाकले पहा आतां, मंदिर सामोरी दिसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

१३

झाली भेट उराउरीच पहिली, सांगे हृदीचे गुज
तूची एक आधार नित्य मजसी, हेची मनीचे निज
सेवा घे करुनी सदैव अपुली, इतुकेची प्रार्थीतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

१४

पोतेन्यासम राबवित शरीरा, सेवेमध्ये रंगले
पहातो ते सगळे असे गुरुच कीं, ऐसे मनी भावले
रात्रंदिन मनी, ध्यास एक गुरुचा, तपस्येसी आचरीतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

१५

संवत्सर तीन यापरी उलटले, सेवा पुरी जाहली
द्रवली समर्थ माऊली धन्यता, ती श्रीधरास लाभली
आदेश दक्षिणेचा जगदोद्धारा, आजाही ती मिळतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

१६

आज्ञा घेऊन यापरी मग निघे, दक्षिणदिशा लक्षुनी
उत्साहे भरते भरे मन कसे, दृष्टांत तो आठवुनी
एका मागुन एक स्थान पुढती, मार्गास सारीतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

१७

स्नाने ती करुनी त्रिकाळी, आचरी संध्यावंदनादि पहा
मागे माधुकरी निवेदन करी, श्री मारुतीसी अहा
सत्शिष्य सत्गुरुचा, दृढनिष्ठा ही हृदयी असे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

१८

कोठे मान मिळे त्यापरी कुठे अवमान तो होतसे
ज्ञाता कोणी म्हणे तयासी परी तो वेडा कुठे ठरतसे
कोणी भूत पिशाच्च म्हणती, तरी मंदस्मिता करीतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

१९

कोठे देव म्हणून तयासी पुजिती, गांजित नानापरी
ना खेपा करी तो न खंतही मनी, शांतीस तो स्विकरी
यापरी तो पथ आक्रमित अपुला, कर्नाटकी येतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

२०

लोकांत विशेष कार्य करुनी, आला हनुमंतीसीं
काही कार्यवशात् हेतुधरुनी, आला शिगेहळ्ळीसी
महाली जैं श्री शिवानंदस्वामी यांस वदती श्री दत्तप्रभु की दिसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

२१

वाटे योग्य तपासी स्थान बहु हे, श्रीधर तिथे राहिला
स्वामींचे बहुप्रेम त्यावरी असे, मनी तो ऽ ही भारावला
उत्कट स्नेह ऐसा, विघ्न तपामधी, जाणून तो जातसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

२२

आला मंजगुणीत द्वारी प्रभुच्या, तृप्ती मनी पावला
तेथूनी मधुकेश्वरास नमुनी, आतां पुढें चालला
मातेची मग भेट जाहली पुढे, संवाद साधितसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

२३

वर्षाऋतु पातला निशिदिनी पाऊस तो कोसळे
पद यात्रेमधी खंड ना अणुभरी, व्याधीस संधी मिळे
दुर्लक्षित तनु असे सततची, आहार तोही नसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

२४

कुष्णी सोरब आदि ग्राम करूनी, पथ तो पुढे चालती
आता देह थके जरी न, मन थके, व्याधी असे संगती
देखे मंदिर एक प्रभुचे, क्षण विश्राम तो घेतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

२५

वार्ता प्रसृत जाहली मग आले, जिज्ञासु भेटावया
केले तृप्त मनी अति तया ज्ञान प्रबोधोनिया
होता सज्जन कृष्णमुर्ति तिथला, सारी दशा पहातसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

२६

सेवा साधूची तो अति करतसे, प्रेमे मनापासून
झाली पूर्ण कृपा तया श्रीगुरुची, झाले पहा दर्शन
त्या ग्रामी कुणी एक भक्त असती त्यांच्यागृही येतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

२७

सेवेचा मग लाभ त्यासी दिधला, विश्रांतीही जाहली
ध्येयासी मग गांठण्या लवकरी, स्वारी पुढे चालली
आले आश्रमी त्यादिनी थबकती, सेवा सुरू होतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

२८

संधी साधुनी तेथून निघती ते, कोडसाद्री गांठावया
आहे रम्य नितांत सुंदर असे, स्थल ते तपस्येसी या
घालुनी आसन ते गिरीवरी, सुदीर्घ तपा करीतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

२९

लाभे पूर्ण कृतार्थता मग तया, वनवासीसी पातला
भेटे साधू तिथे महान समसमा, संयोग की जाहला
त्याची साधू समागमे पुनरपि शिगेहळ्ळीसी तो येतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

३०

वर्षे चार पुरी तिथे असतो ते, स्वामीचिया संगती
प्रेमाची बरसात त्यावरी अति, गुंगून जाते मती
जातां पुनरपि ओढ बहु असे, सज्जनगडा येतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

३१

माहेरी आली कन्यका बहु दिसा आनंद तैशापरी
चाले गुज मनीचे गुरु संगती, खुले कळी यापरी
येथेची भगवान् पद मिळे, गुरुसमर्थ तो देतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

३२

कांहीं दिन यापरी आनंदी रमले, जाणे आले संप्रती
सप्ताहासी आले निमंत्रण आता, श्री याणास येण्याप्रती
कांहीं शिष्यसवे घेऊनी मग निघे, श्रीक्षेत्री तो येतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

३३

येतिल श्रीधर साधुजी श्रीक्षेत्री, वार्ता जधी लागली
गेले खास करोनी भक्तजन तै, बोलाविण्या माऊली
स्वागत अति भव्य दिव्य करीती, प्रेमासी पूर येतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

३४

केला आश्रम तो सुसज्ज तिथला, सर्वार्थ साधोनिया
दिली प्रचिती सुभक्ता रुप अपुले, ध्यानात दावोनिया
सर्वोपरी गुरु आज्ञा मानोनिया, मग संन्यास तो घेतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

३५

सप्ताह होई नामाचा उत्साहाने, कॉफी मळ्यातची पहा
आला प्रत्यय सेवकासी पुनरपि, दत्तप्रभु हाची हा
ज्ञानाची करी पेरणी सुक्षेत्री, भक्ती रोपास लावितसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

३६

आता कद्रीगुडा अतृप्त अड्डा, शांती तिथे पिकविली
कृती दुध पिते तृप्ती स्वामी ते, यापरी एकता दाविली
बालाजी प्रतिक्षा करी झडकरी भेटीस तो येतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

३७

कोठे मूर्तीत चित्कळा उजळती, कोठे करी स्थापना
तीर्थांची करी दूर ती मलीनता, क्षेत्राची जोपासना
कोठे धर्म प्रचार हेतु धरुनी, संचार तो करीतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

३८

श्री नारायण दे आदेश प्रभुना बदरीस येण्यास्तव
घेवोनी निज शिष्य दोन संगती ते सिद्ध जाण्यास्तव
प्रथम दर्शन श्रीसत्गुरुचे, सज्जनगडी येतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

३९

मार्गी न्याहाळीत विश्वरुप आगळे, आले तिघे मंदिरी
सार्थची ये पदबंध स्तोत्र रचना उत्स्फूर्त ती वैखरी
केले दान अमाप इच्छित जसे, की कुबेरची गमतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

४०

जागृत स्थान असे दत्तप्रभुचे, गिरीनारी तो पातला
न्याहाळीत स्वरुप आगळे, अनुभवची हा वेगळा
प्रभु दत्तासी स्मरोनी तैं पुनपुनः, प्रस्थान ठेवितसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

४१

द्वारच जणू मोक्षाचे द्वारका ती, त्या द्वारके भितरी
आठवित मनी कृष्णायन, तेथें ये श्रीधर स्वारी
काहीं काळ तिथेच रमला, मग वाडीस तो येतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

४२

वाडी गृह जणू अपुले स्वामी तेथें, विशेषसे रमले
विद्वज्जन जमती सभोती, आत्मचर्चेत ते दंगले
माता दर्शन घेऊनी पुनरपि, माहेरी तो येतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

४३

संसारी आपदा पदोपदी पहा, येती तसे ते जन
तीर्थ प्रोक्षण त्यावरी करी तदा, तैं देती आश्वासन
आले देगलुरी शांतवन करी, मुक्ती पूर्वजा देतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

४४

बालपण अनुसरले, भागानगरा प्रती जधी आले
स्मृतीना मिळे उजाळा, क्षणकाल तैं शैशवात रमले
गाजले कर्नाटक, धर्म जागरण सदैव सुरू असे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

४५

कोठे वारीसी साकडे व्याधीचे, अन् देसी नवे जीवन
कोणा मुक्त करोनी देसी गती तू, निर्दालुनी प्राक्तन
कोणा हात धरोनी कार्य करविसी मार्गासी दावितसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

४६

कोठे कांहीं दिसेल न्यून जरी ते करीसी तू पूर्ण स्वये
जे जे ज्यासी हवे तया पुरवूनी, संतोष देसी स्वये
कोणाचे मन ना कधी दुखविले ऐसीच ही रीत असे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

४७

आले काशीस स्वामी, शास्त्रीपंडित सभोवती जमले
झाली उदंड चर्चा आत्मरूप ते, मूर्तिमान गमले
जेथे जाती तेथे आबालवृद्धा आनंद लुटवितसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

४८

कारीकान अम्मानुरु स्थान असे ते तपासी योग्य भले
देवालय बांधोनी साधकांसी त्या सोयीनुरूप केले
या ना त्या प्रकारे भक्तीमार्गी सकलासी वळवितसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरु वरदापुरासी वसे

४९

केवळ करस्पर्शाने गंगा ज्यांच्या, झुळूझुळू वहात असे
केवळ स्तुती श्लोकाने, वृंदावन ते डोल डोलतसे
तेजोमय ती माता संगतीस्तव, स्थान सोडीतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

५०

आंगिक शक्ति सरस्वती, ज्या त्या काय कमती असे
स्तोत्रे स्तुती नित्य नवी, ग्रंथ रचना सदैव सुरू असे
ज्यातून स्तोत्र भक्तीचा, साधकांना आधारची तो असे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

५१

व्यास अगस्ती जैशा महामुनींची वसती जेथ असे
श्रीदेवी दुर्गा वरदा, वर देण्यासी सिद्ध जेथ असे
एकाग्रता मनाची लाभे जेथे, ते स्थान निवडीतसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

५२

केला जन्मवरी प्रचार गुरुचा, निःसीम व्रतपालन
धर्म जागृती ध्येय ठेवूनी पुढे, त्याची परि आचरण
ऐसा सद्गुरु हयाची परी हा दत्तस्वरूपीं दिसे
तो हा श्रीधर सद्गुरु भवहरू वरदापुरासी वसे

ॐ तत् सत् ।

। धावा ।

गुरु महाराज गुरु । जय जय परब्रह्म सद्गुरु ।।
सद्गुरुनाथ श्रीगुरुनाथ । मी अपराधी घ्या पदरांत ।।
गुरुदत्तात्रया श्रीपाद राया । नृसिंह श्रीधर गुरुराया ।।
रामदास गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ।।
सज्जनगडचे माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ।।
श्रीधर सद्गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ।।
वरदपूरचे माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ।।

श्रीराम जय राम जय जय राम ।
श्रीराम जय राम जय जय राम ।।

० श्री सद्गुरुची आरती ०

सुखसहिता दुखहरिता निर्मळ एकांता ।
कलिमलदहना गहना स्वामी समर्था ।।
न कळे ब्रह्मादिकां अंत अनंता ।
तो तूं आम्हां सुलभ जय कृपावंता ।।
जय देव जय देव जय करुणाकरा ।
आरती ओवाळूं सद्गुरु माहेरा ।।
मायेविण माहेर विश्रांती ठाव ।
शब्दीं अर्थलाभ बोलणी वाव ।।
सद्गुरुप्रसादे सुलभ उपाव ।
रामी रामदासा फळला सद्भाव ।।

० आरती-श्रीधरस्वामींची ०

श्रीधरस्वामी आरती करतों तुजला गुरुराया ।
मन्मानस हें चरणि अर्पुनि ओवाळिन सदया ।।धृ०।।

तूं विश्वंभर, पूर्ण सनातन, तूं सर्वसाक्षी ।
भक्तासाठी धावूनि येसी परब्रह्म लक्षी ।।
तुझ्या कृपेचा महिमा वर्णी भोळा शंकर ।
चिन्मय व्यापक, सर्व चराचर, तू विश्वंभर ।।१।।

भक्तांचे तूं हट्ट पुरविसी भक्ति पाहोनी ।
दयासागरा ! दीननाथा ! येसी धावोनी ।।
शांतिसुखाची अखंड मूर्ति सद्गुरु श्रीधरा ।
भक्तावरती कृपा करुनियां चुकवि जन्म फेरा ।।२।।